पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ५२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १६/३/२०२१** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र. १४२०

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/२/२०२१ ते दि.२८/२/२०२१ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घकव्यका/४८८३ दि. ४/३/२०२१ चे पत्र.

उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. १४२१

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जानेवारी २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/७०६० दि.३/३/२०२१ चे पत्र.

मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १४२२**

मा.किशोर धनकवडे यांचे दि. ४/३/२०२१ चे पत्र.

**गाव मौजे आंबेगाव बु.ाा तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील स.नं. २५/६/२अ, स.नं. २५/६/३, स.नं. २५/६/४, स.नं. २५/६/५, स.नं. २५/६/६, स.नं. २५/८, स.नं. २५/९/६, स.नं. २५/९/७, स.नं. २५/९/१०, स.नं. २५/९/१२, स.नं. २५/९/१७ येथील कनेक्टीविटी मिळणेसाठी अस्तित्वातील ९ मीटर रस्ता रुंद करुन २१० प्रमाणे पुर्व पश्चिम रस्ता प्रस्तावित करावा.**

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. १४२३

दि. २५/१/२०२१ ते दि. ३१/१/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/७९८ दि. २५/२/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. १४२४

दि. १/२/२०२१ ते दि. ७/२/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/७९९ दि. २५/२/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. १४२५

दि. ८/२/२०२१ ते दि. १४/२/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५३ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८०० दि. २५/२/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र. १४२६

दि. १५/२/२०२१ ते दि. २१/२/२०२१ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८८० दि. ८/२/२०२१ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

विषय क्र. १४२७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशोब तपासणीबाबतचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/२३०३ दि.५/३/२०२१ ने पाठविलेला सन २०१८-२०१९ चा वार्षिक वृत्तांत विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

विषय क्र. १४२८

जिजाऊ सोसायटी, आंबेडकरनगर ते मार्केट यार्ड महेश सहकारी बँक नाल्यापर्यंत मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सचिन मारुती देडे अँड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२४,९९,७८५=५० पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४,७५,०३७=६२ व अधिक जी.एस.टी. र.रुपये २,९७,००४=५१ असे एकुण र.रुपये २७,७२,०४२=१३ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/९०७ दि.९/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४२९

खडकवासला ते स्वारगेट सायकल ट्रॅक करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शुभंम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,७४,८४,७४३/- पेक्षा १३.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,५१,७३,२५९=९८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २०,९८,१६९=१६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ३,६६,०७०=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १७,४३०/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/९०९ दि.९/३/२०२१ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

विषय क्र. १४३०

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४३१

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरात फलकांना चुकीच्या पद्धतीने परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरिक्षक यांना

ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३२**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४३७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४३८

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४३९

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४०

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४१

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४२

प्रभाग क्र. ३८ अ मधील बिबवेवाडी स.नं. ६५९ पार्ट येथील प्रसुतिगृह व प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे अर्धवट काम पुर्ण करुन कोव्हीड–१९ चे उपचाराकरिता तात्पुरत्या स्वरुपात ऑक्सीजन हॉस्पीटलची व्यवस्था करणेसाठी र.रु.३६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३०२ दि.२४/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, CE20A1249/A6-211, पुणे शहरातील HCMTR रस्ते विकसीत करणे | ३६५ लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>अधिक्षक अभियंता (भवन) कार्यालय, प्रभाग क्र. ३८ अ मध्ये राजीव गांधी नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे, CE17A242/SJ6-375 | ---- | ३६५ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४३

पुणे पेठ कोंढवा खुर्द, कौसरबाग परिसरातील स.नं.११ मधील भालदार बिल्डींग ते संपन्न हॉटेल पर्यंतचा ६ मीटरचा रूंदीचा रस्ता ९ मीटर रूंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये आखण्याबाबत मा. ॲड अब्दुल अहंमद गफुर पठाण यांचे दि.१०/१२/२०१९ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४६ दि.१०/१/२०२० विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ९/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४४

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील संचलन तूट बाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२०९९ दि. १०/२/२०२१ ने केलेला लेखापरिक्षण अहवाल विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २६/२/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४५

मे.टाटा प्रोजेक्ट लिमिटेड यांचे ९९.९% शेअर असलेल्या SPV कंपनी मे उज्ज्वल पुणे लि.कंपनी यांच्याकडून design build finance operate maintain and transfer या धर्तीवर पुणे शहरातील रस्त्यांवर यापूर्वी मान्यता प्राप्त एल ई डी फिटिंग्ज संख्या ८७,४६३+उर्वरित जुने सोडियम व्हेपर व T5 बदलून बसविण्यात आलेले एल.ई.डी. फिटिंग्ज –२८६२ असे एकूण ९०,३२५ एल ई डी फिटिंग्ज व १५०० feeder basis SCADA बसवून त्यांचेकडून प्रकाश व्यवस्था करण्याचे कामे करून घेण्यात आल्याचे बाब व त्यानुसार ठेकेदारास एनर्जी सेव्हिंगचे बिलातून दरमहा पेमेंट अदा करण्यात येणार असल्याचे बाब निदर्शनास आणण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/७५२ दि. १६/२/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ९/३/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. १४४६

मे.रिलायन्स जिओ इन्फो कॉम लि. या मोबाईल टॉवर्स कंपनीचे रद्द, दुबार, सी.सी. टॉवर्सचा वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/८५५ दि. २/३/२०२१ चे पत्र.

१. मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. या मोबाईल टॉवर कंपनीचे उभारण्यात न आलेल्या १५ टॉवर्सचे संगणक मिळकत क्रमांक शून्य करणेस तसेच सदरील मोबाईल टॉवरचे संगणकावरील मिळकत कर रक्कम रु.५,५३,२६,४२९/- इतका निर्लेखित करणेस.
२. एकाच मिळकतीवर दोनवेळा (दुबार) आकारणी झालेल्या १९ दुबार मोबाईल टॉवरचे संगणक मिळकत क्रमांक शून्य करणेस तसेच सदरील मोबाईल टॉवरची संगणकावरील मिळकत कर र.रु. ८,२०,७५,३७२/- इतका निर्लेखित करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ९/३/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र. १४४७

अपिल उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.४५४७ दि. १०/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४४८

ऑडीट उपसमितीची नियुक्ती करुन मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.४५४८ दि. १०/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४४९

पुणे महानगरपालिकेच्या मान्य गणवेश नियमावलीनुसार स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांकरिता आवश्यक साहित्याची मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे होणारी **एकूण रक्कम रुपये 2,04,04,085/-** निश्चित करून लाभार्थ्यांचे बँक खाती जमा करणेकामी तसेच महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक - डीसीटी/प्र.क्र. 133 / का 1417, दिनांक - 5/12/2016 मधील अ.क्र. 2 नुसार विनिर्दीष्ट करणेत आलेल्या विहीत कार्यपध्दतीन्वये खर्च रक्कम सन 2020 - 2021 मधील अंदाजपत्रकातील RE11K108 या अर्थशिर्षकावर रक्कम रुपये - 9 कोटी इतकी तरतूद उपलब्ध असून त्यावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/९१० दि. १०/३/२०२१ चे पत्र.

विषय क्र. १४५०

सन २०१९–२० या आर्थिक वर्षातील पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण मा.मुख्य लेखापरिक्षक यांचेकडून प्रमाणित झाल्याने सन २०१९–२० च्या संचलन तुटीपोटी कळविणेत आलेल्या रकमेपोटी पुणे महानगरपालिकेडून देय ठरणारी उर्वरीत रक्कम रु.१९,८१,२१,८२९/– RE58A101A “PMPML” च्या संचलनामधील तुटीपोटीचा हिस्सा या अर्थशिर्षकामधून PMPML संस्थेस आदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले व वि.अ./९११ दि. १०/३/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)